॥ श्री ॥

॥ यमुनाष्टकम् ॥

१. मुरारिकाय कालिमा ललामवारि धारिणी
तृणीकृतत्रिविष्टपा त्रिलोकशोकहारिणी ।
मनोऽनुकूल कूल कुञ्ज पुञ्ज धूत दुर्मदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥१॥

मुरारि (विष्णू) ची काया जशी सावळी आहे तसा काळा वर्ण असणारी (पाण्याचा रंग काळा) आणि तो अलंकाराप्रमाणे मिरवणारी अशी ही यमुना आहे. काळा रंग हा संग्राहक आहे. शैत्यापासून रक्षण करणारा आहे. ही यमुना इतकी सामर्थ्यशाली आहे की स्वर्गदेखील तिच्यापुढे फिका पडतो.

त्रिविष्टप - The World of Indra/Heaven।

तृणीकृत - कस्पटासमान । तिन्ही लोकांचे दुःख हरण करणारी
जिच्या किनाऱ्यावर मनोहर असे लताकुंज व वृक्षसमूह शोभून दिसतात. ते मनाला अनुकूल म्हणजेच प्रसन्नता प्रदान करतात. कूल - किनारा।

राधामाधवयो: जयन्ति यमुनाकूले रह: केलय:॥ 1-58

पुञ्ज - Heap, Mass, Quantity ढीग रास Collection.
पापांच्या राशी नष्ट करणारी, मदमोहादि विकार नाहीसे करते. हरि उच्चारणी अनंत पापराशी, जातील लयासी क्षण-
अशी ही कलिन्दकन्या यमुना माझ्या पापांचे क्षालन करो. माझ्या मनावर साचलेला सूक्ष्म मल नाहीसा करो.

© www.madhaveeraghuveer.com

यमुनाष्टकम् (दुसरे)

कृपापारावारां तपनतनयां तापशमनीं
मुरारिप्रेयस्यां भवभयदवां भक्तवरदाम्।
विपज्ज्वालोन्मुक्तां श्रियमपि सुखाप्तेः प्रददतीं
सदा धीरो नूनं भजति यमुनां नित्यफलदाम्॥१॥

© www.madhaveeraghuveer.com

मधुवनचारिणि भास्करवाहिनि जाह्नविसंगिनि सिन्धुसुते
मधुरिपुभूषणि माधवतोषिणि गोकुलभीतिविनाशकृते।
जगदघमोचिनि मानसदायिनि केशवकेलिनिदानगते
जय यमुने जय भीतिनिवारिणि संकटनाशिनि पावय माम्।

मलापहारिवारिपूरभूरिमण्डिताऽमृता
भृशं प्रपातकप्रवञ्चनातिपण्डिताऽनिशम् ।
सुनन्दनन्दनाङ्गसङ्गरागरञ्जिता हिता
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥२॥

सगळ्या पापांचा परिहार [अपहार] करणारी अशी यमुना अनंत आहे.. अमृताप्रमाणे संजीवक असणाऱ्या जलराशींनी ती नटलेली आहे. मोठमोठ्या पातकांना देखील ही हूल देते. फसवते. प्रपातक - प्रकर्षाने पातके। सुनन्द (उत्तम गृहस्थाश्रमी) नंदन (प्रियपुत्र, लडका) त्याच्या अंगसंगामुळे श्यामल झालेली. अशी यमुना त्याची वामांगी (पत्नी) आहे.

पतीपत्नीचे जर विचार जुळत असतील त्यांच्यामध्ये मतैक्य असेल तर कालांतराने ते एकमेकांसारखे दिसू लागतात. स्वभावातील वैशिष्ट्ये परावर्तित होतात.

हा मुरारी करुणार्णव आहे. त्याच्या संगतीमुळे ही देखील भक्तांचे कल्याण करणारी अशी हिता झाली आहे.
ती सुहिता आहे.

© www.madhaveeraghuveer.com

③ आयि मधुरे मधुमोदविलासिनि शैलविदारिणि वेगपरे
परिजनपालिनी दुष्टनिषूदिनि वाञ्छितकामविलासधरे।
व्रजपुरवासिजनार्जितपापकहारिणि विश्वजनोद्धरिके
जय यमुने जय भीति निवारिणि संकटनाशिनि पावयमाम्

④ अति विपदम्बुधिमग्नजनं भवतापशताकुलमानसकं
गतिमतिहीनमशेषभयाकुल मागतपादसरोजयुगम्।
ऋणभयभीतिमनिष्कृतिपातक कोटिशतायुतपुञ्जतरं
जय यमुने जय भीतिनिवारिणि संकटनाशिनि पावयमाम्

© www.madhaveeraghuveer.com

लसत्तरंगसंगधूतभूतजातपातका
नवीनमाधुरीधुरीण भक्तिजातचातका
तटान्तवासदासहंससंवृता हि कामदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा॥३॥

आपल्या शोभिवंत आणि तेजस्वी तरंगांच्या स्पर्शाने सर्व भूतमात्रांच्या पापांचा नाश करते. नवनवीन माधुर्याच्या आस्वाद घेण्यात रममाण होणारे भक्त तिच्या कृपेची चातकासारखी वाट पहातात. तिच्या तीरावर भक्तरूपी हंसांची सतत वर्दळ असते.

© www.madhaveeraghuveer.com

या राका शशिशोभना गतघना सा यामिनी यामिनी
या सौन्दर्यगुणान्विता पतिरता सा कामिनी कामिनी।
या गोविन्दरसप्रमोदमधुरा सा माधुरी माधुरी।
या लोकद्वयसाधनी तनुभृतां सा चातुरी चातुरी॥

विहार रास खेद भेद धीर तीर मारुता
गता गिरामगोचरे यदीयनीरचारुता।
प्रवाह साहचर्य पूत मेदिनी नदी नदा
पुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ॥८॥

या यमुनेने कितीतरी रास क्रीडा पाहिल्या आहेत. अनुभवल्या आहेत. तिच्या काठावरील शीतल वायुमध्ये विहार करण्यासाठी कितीतरी प्रेमी जन येतात. रासक्रीडा करताना देहभान हरपतात. मात्र या क्रीडेत देखील श्रम होतो. परंतु त्या श्रमाचा परिहार करण्यात देखील ती तत्पर आहे. तिच्या जलाचे सौंदर्य वर्णन करताना वाणी विराम पावते. शब्द संपतात परंतु हिचे सौंदर्य सरत नाही. हिच्या प्रवाहाच्या साहचर्यामुळे ही मेदिनी (पृथ्वी) पवित्र झाली. लहानमोठ्या नद्या पवित्र झाल्या.

ताजमहाल - उत्कट प्रीतिचे प्रतीक
बादशहाच्या अमर प्रीतिचे मंदिर एक विशाल।
यमुनाकाठी ताजमहाल ॥

© www.madhaveeraghuveer.com

तरंगसंगसैकताञ्चितान्तरा सदाऽसिता।
शरन्निशाकरांशु मञ्जु मञ्जरी सभाजिता।
भवार्चनाय चारुणाम्बुनाऽधुना विशारदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा॥४॥

Made of sand
Sandy

आपल्या (असिता) सावळ्या जलतरंगामुळे जी आसपास असणारा वालुकामय प्रदेश देखील शोभिवंत करते. शरद ऋतुतील चंद्रकिरणारूपी मंजिरींनी जी सुंदर दिसते. शरद + निशाकर + अंशु | मंजिरी - आकर्षक तुरे | वृक्ष जेव्हा बहरतो तेव्हा सर्वांगावर मंजिऱ्या, मोहक शोभून दिसतो. शरद ऋतूमधील चंद्र हा पूर्ण वैभवानिशी झळकत असतो.

चारुणा अम्बुना या भवार्चनाय विशारदा आहे। आपल्या सुंदरशा जलतरंगाने सृष्टीची पूजा करण्यात जी अतिशय निपुण आहे. ती कलिंदकन्या यमुना माझ्या पापांचे क्षालन करो.

पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः
स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः।
नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः
परोपकाराय सतां विभूतयः॥

© www.madhaveeraghuveer.com

जलान्तकेलि कारिचारु राधिकाङ्गरागिणी
स्वभर्तुरन्य दुर्लभाङ्ग संगतांशभागिनी।
स्वदत्तसुप्त सप्तसिन्धु भेदनाऽतिकोविदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा॥५

आपल्या जलामध्ये क्रीडा करणाऱ्या सुंदरशा श्रीराधेच्या अंगरागाने जी रंगली आहे. इतरांना दुर्लभ असणारा मात्र त्याची मनोमन वांछा केली जाते असा श्रीरंग जिला सहजतेने लाभला आहे. दोघेही परस्परांवर अनुरक्त आहेत. त्याच्या प्रीतीने जी भाग्यशालिनी झाली आहे, इतरांच्या हेव्याच्या असूयेच्या विषय झाली आहे. अशी यमुना जेव्हा शांत अशा सागराला मिळते तेव्हा ती आपल्या अवखळ तरंगांनी त्यात खळखळाट उत्पन्न करते. अशी कालिंदी माझ्या पापांचे क्षालन करो.

© www.madhaveeraghuveer.com

जलच्युता च्युतांगराग लम्पटालि शालिनी अलि
विलोलराधिकाकचान्त चम्पकालि मालिनी। कच
सदावगाहनावतीर्ण भर्तृभृत्यनारदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा॥७॥

श्रीकृष्ण जेव्हा यमुनेत स्नान करतो तेव्हा त्याने अंगाला लावलेली उटी पाण्यात मिसळते. त्या उटीच्या सुगंधाने मोहित होऊन भुंगे आकर्षित होतात. आणि अशा भुंग्यांच्या समूहामुळे यमुना सुशोभित होते. शिवाय श्रीराधा जेव्हा या जलक्रीडेशी खेळत असते तेव्हा तिच्या वेणीतून गळून पडलेल्या चाफ्याची फुले शोभिवंत दिसत आहेत. पाणी सुगंधित करत आहेत.

भर्तृ - पती, भृत्य - दास। यमुनेचा पती असणाऱ्या कृष्णाचे (श्री विष्णूचे) दास असणारे नारद इ. भक्त स्नानासाठी नित्य प्रवाहामध्ये अवगाहन करतात.
अशी कालिंदी

© www.madhaveeraghuveer.com

सदैव नन्दनन्दकेलि शालिकुञ्ज मंजुला
तटोत्थफुल्लमल्लिका कदम्बरेणुसोज्ज्वला।
जलावगाहिनां नृणां भवाब्धिसिन्धुपारदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा॥८॥

नंदाला आनंद देणारा असा नंदनंदन श्रीकृष्ण! त्याच्या लीलांचे वर्णन तरी किती करावे? यमुनेच्या तटावर अनेक लताकुंज, मधुवन आहेत. तिथे ~~त्या~~ या गोपालकृष्णाने गोप गोपिकांबरोबर क्रीडा केली आहे. त्यामुळे ती सुशोभित झाली आहे. त्या तीरावर जाईच्या फुलांच्या वेली आहेत. तसेच कदंबवृक्ष आहेत. कदंबफुलांच्या परागांनी ती गौरवर्णीय दिसते. यमुनेच्या जलात स्नान करणाऱ्यांना ती भवसागरातून तारून नेते अशी कालिंदी----

© www.madhaveeraghuveer.com

२४ नोव्हेंबर २१

# जल नहीं तो कल नहीं।

पाण्या तुझा रंग कसा? ज्यात मिसळावा तसा।
खरंच आहे. स्थूलतेच्या क्रमाने पाहिले असता पाणी हे दुसऱ्या क्रमांकाचे महाभूत आहे. शब्द, स्पर्श, रूप आणि रस यांनी ते युक्त असले तरी त्याला स्वतःचा असा गंध नाही. परंतु पाण्याचा सहजस्वभाव असा की ते कशातही सहजपणे मिसळून जाते व त्या पदार्थाचा गुणधर्म धारण करते. म्हणजे एकाच प्रकारचे पाणी जर कारल्याच्या वेलीला दिले तर ते कारल्याच्या रूपाने कडूपणा धारण करते. चिंचेमध्ये तेच पाणी आंबट होते तर आंब्यामध्ये ते मधुर रसाने व्यक्त होते. पाणी हे सर्वांचे जन्मस्थान आहे. ते सर्वच सजीवांसाठी जीवनावश्यक आहे आणि म्हणूनच पाण्याला जीवन म्हणतात. परंतु या पाण्याचा आदर करायला हवा कारण पाणी जसे तारक तसे मारकही

कधी निर्मायक कधी विनाशक
कधी संजीवक आश्वासक।
अनंत याची रूपे तरीही, कुणा न कळे ठाव।
श्वासाइतुके मोल जळाचे, जीवन याचे नाव।

खरोखर माणसाच्या श्वासाइतकेच पाण्याला महत्त्व आहे. माणूस काही काळ अन्नावाचून राहू शकेल पण पाण्यावाचून फार काळ राहणे माणसाला शक्य नाही.

जल — यस्मात् जायते जगत् यस्मिन् लीयते च।

पाणी माणसाला अनेक प्रकारची सुखे देते. पाणी पाणी प्यायल्याने तर समाधान मिळतेच पण पाण्याच्या केवळ दर्शनाने, आवाजाने किंवा स्पर्शाने देखील चैतन्याची अनुभूति येते. आपल्याकडे पूर्वी उन्हातून

© www.madhaveeraghuveer.com

थकून भागून आलेल्या माणसाला गूळ पाणी देण्याची प्रथा होती. सुकलेल्या घशाला पाण्यामुळे ओलावा मिळतो अंतरात्मा तृप्त होतो आणि मनापासून आशीर्वादाचे शब्द ओठी येतात. आणि म्हणूनच उन्हाळ्यात पाणपोया घालणे हे पुण्याचे काम समजले जाते. आपल्याकडे नद्यांना माता मानले जाते. नद्यांच्या काठचा प्रदेश सुपीक असल्याने फार पूर्वीपासून तिथे वसाहती झाल्या. त्यातूनच पुढे गावे शहरे वसवली गेली. ज्यांच्याजवळ पाण्याचा अखंड स्रोत आहे त्यांना आपण समृद्ध, संपन्न मानले जाते. शेती, भाती, अन्नधान्य हे सर्व पाण्यावरच अवलंबून आहे. पाणी हे माणसाला मिळालेले वरदानच आहे. मात्र त्याचा प्रसादरूपाने स्वीकार व्हायला हवा. पाण्याचा वापर यथायोग्य व सीमित व्हायला हवा.

आपल्या देशात तर कितीतरी जलसमृद्ध अशा नद्या आहेत. त्यांचे जळ आहे आणि म्हणूनच आपला देश सुजलाम सुफलाम आहे. जीवनदायिनी असे सार्थ नाव आपण नद्यांना देतो.

गंगा सिंधु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा
कावेरी सरयू महेंद्र तनया चर्मण्वती वेदिका
क्षिप्रा वेत्रवती महासुरनदी ख्याता जया गंडकी
पूर्णाः पूर्णजलैः समुद्रसहिताः कुर्वन्तु मे मंगलम्॥

गंगा + यमुना + सरस्वती – त्रिवेणी संगम.
सरस्वती गुप्त झाली. मात्र नर्मदेचे माहात्म्यही आहेच.
गंगा – ज्ञान / यमुना – भक्ती / नर्मदा – वैराग्य.

© www.madhaveeraghuveer.com

॥यमुनाष्टक॥ २५ नोव्हेंबर २१

जल नहीं तो कल नहीं। जल - जन्म पावणारे, लय पावणारे

सर्वच संतांनी आपली साधना नदीकिनारी केली

संत ज्ञानेश्वर माऊली - इंद्रायणी, गोदावरी | शंकराचार्य पूर्णा, नर्मदा, गंगा

तुकाराम महाराज - इंद्रायणी, चंद्रभागा

एकनाथ महाराज - गोदावरी

श्री समर्थ रामदास स्वामी - गोदावरी, उरमोडी (उर्वशी)

अंगापूरच्या डोहामध्ये राममूर्ती मिळाली. सज्जनगडावर पाण्याचे टाके आहे. कृष्णा, कोयना, मांड, उर्वशी या नद्यांच्या प्रदेशात समर्थांचे कार्यक्षेत्र होते. त्यांना जलसंपत्तीची विद्या अवगत होती. समर्थांच्या आध्यात्मिक उन्नतीचे साक्षीदार हे जलतत्त्व होते. नद्यांशी संवाद साधत असत.

यमुनेशी तर कृष्णाचा नित्य संवाद होत असे. सर्व खेळ गोपगोपींसमवेत इथेच खेळले जात. असेच एकदा कंदुकक्रीडा करत असताना त्यांचा चेंडू यमुनेच्या डोहात गेला ज्यात कालिया नावाचा अतिविषारी नागराज रहात होता. — कालियामर्दन करून यमुनानिवासी जनांना गोपालकृष्णाने भयमुक्त केले.

सर्पफणीवर कृष्ण नाचला यमुनेच्या डोही।
अशी अलौकिक कथा कधी कुणी ऐकिलीच नाही।

मुरलिया बाजे रे जमुना के तीर।
कैसे आऊँ जमुना के तीर? पाँव पड़ी जंजीर।

© www.madhaveeraghuveer.com

पृथ्वीच्या भोवती आवरणोदक आहे आणि पृथ्वीवर जवळजवळ ७०% पाणीच आहे. त्यात सात समुद्र आहेत. असंख्य नद्या आहेत. तैग्रीस, युफ्रेटिस, व्होल्गा, थेम्स, हडसन, ओकॅगेटँगी अशा नद्या परदेशात आहेत. याशिवाय कितीतरी झरे, ओढे, नाले, ओहळ, सरोवरे, तलाव, बांध, डोह, धबधबे आहेत. याशिवाय आड, विहिरी पाट कालवे आहे. काही ठिकाणी तर पृथ्वीच्या पोटातून गरम पाण्याचे झरे वाहतात. ते पाणी गंधकयुक्त म्हणजे औषधी असते. मात्र एक गोष्ट निश्चित की जिथे पाणी असते तिथे चैतन्य असतेच. ~~आपोनारायण हे समुचित नाव~~ जीवन एवढेच नाही तर आपल्याभोवतीच्या हवेतील आर्द्रता, बाष्प, देखील अंतर्भूत आहे. प्रत्यक्ष न दिसणाऱ्या बाष्पामुळे हवेतील ओलावा, थंडावा टिकून राहतो. पाण्याच्या केवळ आवाजदेखील नवनिर्मितीची ऊर्जा देतो.

श्री समर्थांनी साधकांना बोध ज्या ग्रंथातून केला तो '<u>ग्रंथराज दासबोध</u>' तर शिवथरघळ येथील धबधब्याच्या अगदी जवळ बसूनच सांगितला आहे.

गिरीचे मस्तकी गंगा। तेथूनि चालली बळें।
धबाबा गर्जती धारा। धबाबा तोय आदळे।

पाण्याच्या प्रत्येक थेंबाला ओढ असते ती आपल्या उगमाकडे म्हणजे समुद्राकडे वाहत जाण्याची। जलचक्र। जल, नीर, तोय, आप, सलिल, वारि, अंबु, उदक अशी कितीतरी नावे असली तरी सर्व जीवांना जीवन देणारे म्हणून आपोनारायण हे समुचित नाव आहे. वरुण ही पाण्याची देवता। आपल्या देहात तो जिभेत वास करतो. जीभ ओली। नार-(पाणी) हे ज्याचे अयन आहे तो नारायण।

©www.madhaveeraghuveer.com

★ तीर्थ आणि उदक या नावातून पवित्रता प्रकट होते
आणि म्हणूनच आपल्या देशात नद्यांच्या तीरावर
मोठमोठी पुरातन मंदिरे आहेत. त्यांना तीर्थक्षेत्रे
म्हणतात. गंगा, यमुना, कावेरी शरयू (अयोध्या) नर्मदा
तसेच कहान मोठ्या गावातून वाहणाऱ्या नद्यांना देखील
गावकरी मोठ्या आदराने गंगा म्हणतात.
गोदावरी, कृष्णा, कोयना याबरोबर शरयूच्या,
मलप्रभा, सावित्री, मांडवी, नीरा, भीमा --
गंगा, गोमती, भागीरथी, अलकनंदा, मंदाकिनी --
→ प्रयाग, गया, हरिद्वार, हृषीकेश / नर्मदेच्या तीरावर
ओंकारेश्वर अमरकंटक / काही ठिकाणी पाण्याला गंगा

नद्या पर्वतांहून कोसळल्या / नाना सांकडी मध्ये रिघाल्या /
खळाळा खळाळा चालल्या / असंभाव्य //

ज्या प्रदेशातून वाहत येते, त्याचे गुणधर्म - गोड, मचूळ
खारे, विषारी, क्षार
पाण्याचे अव्यक्त रूप

★ पाणी जसे व्यक्तरूपाने दिसते तसे अव्यक्त रूपाने
अनुभवाला येते. मोती पाणीदार असतात. रत्नांचे
तळपणे चमकणे - पाणी असल्याचीच खूण!
निरनिराळ्या शस्त्रांना, हत्यारांना पाणी असते.
लढणारे किंवा तलवारीचे पाणी पाजणे - शब्दप्रयोग।
पाणीदार डोळे - संवादाचे काम करतात

नाना मुक्ताफळांचे पाणी / नाना रत्नी तळपे पाणी
नाना शस्त्रांमध्ये पाणी / नाना गुणांचे //

उदा. शिवाजी महाराज - पाणीदार नेतृत्व, कर्तृत्व

उदकाचे देह केवळ / उदकाचेचि भूमंडळ /
चंद्र मंडळ भूमंडळ / उदकाकारिता /

नद्यांकडून काय शिकायचे? वाटेत आलेला खडा ती
पाण्याने मऊन पुढे जाते व अडथळा ओलांडून जाते.

© www.madhaveeraghuveer.com